■ वर्ष : ०४ ■ अंक: २२ ■ मुंबई, मंगळवार २४ एप्रिल २०१८ ते ३० एप्रिल २०१८ ■ पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 आणखी किती बळी जाणार ?

3 → नाणार खरेच येणार ?

मद्याच्या जाहिरातींचे फलक हटवा ← 4

# राज्याचीही इंधन दरवाढीने होरपळ



## पेट्रोलनं गाठला पाच वर्षांमधील उच्चांक; डिझेल दरही भडकले

**मुंबई - आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाचे दर वाढत असल्याचा थेट परिणाम होऊन देशात पेट्रोल व डिझेल या इंधनांचे दर उच्चांकी पोहोचले आहेत. गेल्या ५५ महिन्यांतील हा उच्चांक नोंदवला गेला आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक मोठ्या शहरांतही दरवाढीची झळ बसू लागली असून, ही वाढ महागाईस चालना देणारी असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.**

गेल्या काही दिवसांपासून पेट्रोल आणि डिझेलचे भाव सातत्यानं वाढत आहेत. राजधानी दिल्लीत पेट्रोलची किंमत ७४ रुपये ८ पैसे प्रतिलिटर असून, सप्टेंबर २०१४नंतरचा हा सर्वाधिक उच्चांक आहे. अशाच प्रकारे डिझेलची किंमत राजधानीत ६५ रुपये ३१ पैसे प्रतिलिटरपर्यंत गेली आहे. याआधी डिझेल एवढं महाग कधीही नव्हतं. मुंबईतही पेट्रोलच्या किमतीचा भडका उडाला आहे. पेट्रोलची किंमत ८१ रुपये ९३ पैसे प्रतिलिटर झाली आहे. पेट्रोल आणि डिझेलही वाढत्या भावाला आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किमती हे कारण असल्याचं बोललं जातंय. आता हे पेट्रोल आणि डिझेलचे भावात दरदिवशी चढ-उतार होत असतात. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाची किंमत जशी वाढते, तशाच प्रकारे पेट्रोल आणि डिझेलही महाग होत जातं. सध्या आंतरराष्ट्रीय बाजारात पेट्रोलचा दर ७१.८५ अमेरिकन डॉलर प्रति बॅरल इतका आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर वाढत असल्याचा भार देशभरात जाणवत आहे. मुंबईत शनिवारी पेट्रोल प्रति लिटर ८२.०६ रु. आणि डिझेल ६९.७० रु. असे दर होते. शुक्रवारच्या तुलनेत ही वाढ अनुक्रमे १३ आणि १६ पैसे होती. दरवाढीमुळे अवजड वाहतूकदारांप्रमाणे एसटी महामंडळाच्या आर्थिक गणितावर परिणाम होत आहे. पेट्रोल, डिझेलची सुरू असणारी दरवाढ महागाईचा पारा आणखी वाढवत असल्याचे मत इंधनदराचे अभ्यासक डॉ. केदार चांडक यांनी व्यक्त केले आहे.

### मुंबईतील दरवाढ (प्रतिलिटर रुपये)

| दिनांक | पेट्रोल | डिझेल |
|---|---|---|
| २१ एप्रिल | ८२.०६ | ६९.७० |
| २० एप्रिल | ८१.९३ | ६०.५४ |
| १९ एप्रिल | ८१.९२ | ६९.५० |
| १८ एप्रिल | ८१.८७ | ६९.४१ |
| १७ एप्रिल | ८१.८७ | ६९.४१ |
| १६ एप्रिल | ८१.८७ | ६९.४१ |
| १५ एप्रिल | ८१.८३ | ६९.३१ |

मुंबईप्रमाणेच पुणे, कोल्हापूर, नाशिक, नगर, नागपूरमध्येही इंधनाचे दर दररोज उसळी घेत आहेत. पुण्यातील इंधनवाढ अद्यापही कायम असून, पेट्रोल ८२ रुपयांच्या उंबरठ्यावर आहे. जानेवारीत ८० रु.चा टप्पा गाठलेले पेट्रोल आता ८१ रुपये ८० पैसे दराने उपलब्ध आहे. डिझेलचे दरही गेल्या सहा महिन्यांत १० रुपयांनी वाढले आहेत. नाशिकमध्ये शनिवारी पेट्रोलचा दर ८२ रुपये ३० पैसे होते. गेल्या काही दिवसांच्या तुलनेत हे दर सुमारे पाच ते सात रु.नी वाढले आहेत. औरंगाबादमध्येही हीच परिस्थिती आहे. शनिवारी पेट्रोलचा दर ८३.०५ रु. तर डिझेलचा दर ७०.७० रु. होता. चार महिन्यांपूर्वी म्हणजेच २१ डिसेंबर, २०१७ रोजी हेच दर अनुक्रमे ७८.३४ रु. व ६३.१९ रु. होते.



# २८ टक्के जी.एस.टी. लादून लॉटरी उद्योग बंद करण्याचे कुटील कारस्थान शिवसेना हाणून पाडणार

## अक्षय तृतीयाच्या शुभ मुहुर्तावर शिवसेना पक्षप्रमुख मा. श्री. उद्धवजी ठाकरे यांची गर्जना

वंदनिय शिवसेना प्रमुखांच्या स्मृतीस्थळाचे दर्शन घेऊन शिवसेना लॉटरी सेनेचे शिष्ट मंडळ विक्रेत्यांसमवेत मातोश्रीवर आज पक्ष प्रमुख मा. उद्धवजींची भेट घेतली. यापूर्वी लॉटरी ट्रेड बंद करण्याचे प्रयत्न भाजप सरकारच्या माध्यमातून झाले. पण त्यावेळी लॉटरी विक्रेत्यांचे अन्नदाता , उद्योगाचे तारणहार वंदनिय शिवसेना प्रमुख बाळासाहेबांच्या आशिर्वादामुळेच लॉटरी उद्योग वाचला. पुन्हा तात्कालीन केंद्र सरकारच्या २८ टक्केजी.एस.टी मुळे लॉटरी उद्योग अडचणीत आला आहे. कोणत्याही परिस्थितीत तो अडचणीत येणार नाही याची दखल शिवसेना पक्षप्रमुख मा. उद्धवजी ठाकरे यांनी घेतली . आठ लाख लॉटरी विक्रेत्यांना बेरोजगार होणार नाही. शिष्ट मंडळाला अभिवाचन दिले.

एक देश एक कर हे समिकरण लक्षात ठेऊन देशातील केंद्र शासन मान्य राज्य लॉट्या देशात विक्री करण्यास १२ टक्केच जी एस टी लावा अस ठाम मत त्यांनी व्यक्त केलं , त्याच बरोबर लवकरातलवकर महाराष्ट्र राज्याची ऑनलाईन लॉटरी सुरु करण्याबद्दल मी स्वतः हून केंद्राचे अर्थमंत्री तसेच महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्री यांच्याशी लवकरच चर्चा करीन असे अभिवाचन शिष्टमंडळास दिले.

त्यावेळी उपस्थित असलेले शिवसेना खासदार मा. श्री. अरविंद सावंत, मा. श्री. राहूल शेवाळे, विभाग प्रमुख नगर सेविका मा. सौ. किशोरीताई पेडणेकर , आमदार मा. श्री. सुनिल शिंदे, महाराष्ट्र राज्य लॉटरी अभिकर्ता विक्रेता सेनेचे अध्यक्ष श्री. रमाकांत आचरेकर ,उपाध्यक्ष श्री.दिपकमोरेश्वर नाईक, महाराष्ट्र राज्य लॉटरी विक्रेता युनिअनचे अध्यक्ष श्री.चंद्रकांत मोरे, श्री. श्रीनिवास तावडे, शिवसेना लॉटरी विक्रेता सेनेचे अध्यक्ष श्री. मनोज वारंग, महाराष्ट्र राज्य लॉटरी एजंट असोशिएशनचे अध्यक्ष श्री. स्नेहलकुमार शहा, आणि श्री. सुरेश भगत उपस्थित होते.

# १२ वर्षाखालील मुलीवर बलात्कार करणाऱ्यास फाशी



**नवी दिल्ली : काश्मीरमधील कथुआ, उत्तर प्रदेशातील उन्नाव आणि गुजरातमधील सूरत येथे अल्पवयीन मुलींवर पाशवी बलात्कार करून त्यांचे खून केले गेलेल्या घटनांनी देशभर उठलेली संतापाची लाट लक्षात घेऊन केंद्रातील मोदी सरकारने बलात्काऱ्यांना जरब बसेल अशी अधिक शिक्षा देण्याची तरतूद कायद्यांत करण्याचे ठरविले आहे. याचाच एक भाग म्हणून १२ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलीवर बलात्कार करणा-या गुन्हेगारास फाशीची शिक्षा देण्याचीही तरतूद केली जाणार आहे.**

अवघ्या चार महिन्यांच्या तान्ह्या मुलीचा बलात्कारानंतर खून झाल्याच्या इंदूरमधील ताज्या घटनेने अशा कडक कायद्याची गरज अधिकच अधोरेखित झाली. विशेष म्हणजे या सर्व राक्षसी घटना भाजपाशासित राज्यांमधील आहेत. उन्नावमध्ये तर भाजपाचा एक आमदारच आरोपी आहे. यामुळे अडचणीत आलेल्या मोदी सरकारने हा निर्णय तातडीने घेतला आहे. यासाठी भारतीय दंड संहिता, साक्षीचा कायदा, दंड प्रक्रिया संहिता आणि 'पॉक्सो' कायद्यांमध्ये आवश्यक दुरुस्त्या करणा-या वटहुकुमास केंद्रीय मंत्रिमंडळाने शनिवारी मंजुरी दिली. राष्ट्रपतींच्या स्वीकृतीनंतर हा सुधारित कायदा लागू होईल. मात्र आधी घडून गेलेल्या घटनांमधील आरोपींना तो पूर्वलक्षी प्रभावाने लागू होणार नाही. असा कडक कायदा करण्यात येणार असल्याची माहिती केंद्र सरकारने शुक्रवारीच सर्वोच्च न्यायालयास दिली होती.

### अटकपूर्व जामीनही नाही

१६ वर्षे किंवा त्याहून कमी वयाच्या मुलीवर बलात्कार किंवा सामुहिक बलात्कार करणा-यांना अटकपूर्व जामीन देण्यास पूर्ण प्रतिबंध असेल. तसेच अशा गुन्हेगारांनी नियमित जामिनासाठी अर्ज केल्यास पब्लिक प्रॉसिक्युटरला व पीडितेच्या प्रतिनिधीला किमान १५ दिवसांची नोटीस दिल्याखेरीज त्या अर्जावर न्यायालय निर्णय देऊ शकणार नाही.

### पीडितांना सुलभ मदत

बलात्कारपीडित महिला/मुलींना विनाविलंब मदत देता यावी यासाठीची एक खिडकी योजना देशाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये सुरू केली जाईल.

### पीडितेच्या वयानुसार शिक्षा

या वटहुकुमात बलात्कारपीडितेच्या वयानुसार आरोपीस शिक्षा देण्याची तरतूद असेल. पीडितेचे वय जेवढे कमी तेवढी शिक्षा अधिक असे हे व्यस्त प्रमाण असेल. पीडित मुलगी १६ वर्षांहून कमी वयाची असेल तर आरोपीस किमान २० वर्षांच्या कारावासाची शिक्षा होईल. गुन्ह्याच्या गांभीर्यानुसार ही शिक्षा जन्मठेपेपर्यंतही वाढविता येईल.

# गडचिरोलीत चकमकीत १४ नक्षलींचा खात्मा




**भामरागड: गडचिरोली पोलिसांच्या नक्षलविरोधी मोहिमेला सर्वात मोठं यश मिळालं आहे. भामरागड तालुक्यातील ताडगाव जंगल परिसरात राबवलेल्या शोध मोहिमेदरम्यान पोलिसांनी चकमकीत १४ नक्षलवाद्यांना कंठस्नान घातलं आहे. पोलिसांचं 'कोम्बिंग ऑपरेशन' अजूनही सुरूच आहे, अशी माहिती पोलीस महानिरीक्षक शरद शेलार यांनी दिली.**

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी ७ वाजेच्या सुमारास सी-६० पथकाचे जवान ताडगाव परिसरात नक्षलविरोधी अभियान राबवीत असताना बोरिया जंगलात पोलीस आणि नक्षवाद्यांमध्ये चकमक उडाली. ही चकमक ११ वाजेपर्यंत सुरू होती. या चकमकीत १४ नक्षलवाद्यांचा पोलिसांनी खात्मा केला. यात अख्खे दलमच ठार झाल्याचे सांगण्यात येतंय. काही डीव्हीसी, कमांडर व उच्चपदस्थ नक्षलवादी या चकमकीत ठार झाल्याची माहिती पुढे येतेय.

नक्षलवाद्यांचा विभागीय समितीचा सदस्य साईनाथ, सिनू आणि इतर काही कमांडर या दलमसोबत होते. तेही या चकमकीत ठार झाल्याचं सांगण्यात येतंय. पोलिसांनी १४ नक्षलवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेतले आहेत. जिल्ह्यात नक्षल चळवळीचा शिरकाव झाल्यापासूनच्या ३८ वर्षांतील पोलिसांची ही सर्वात मोठी यशस्वी कारवाई आहे.

## सौजन्य व्हॉट्सअप





# शिवसेना उपशाखाप्रमुखाची गोळ्या झाडून हत्या


***मुंबई : कांदिवली पूर्वेतील आकुर्ली येथील शिवसेना उपशाखाप्रमुख सचिन सावंत यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. वैयक्तिक वादातून सावंत यांची हत्या करण्यात आली असावी अशी शक्यता वर्तवण्यात येत असून पोलीस तपास करत आहेत. मुंबईत शिवसेना उपशाखाप्रमुखाची हत्या झाल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.***



सचिन सावंत यांना काहीच दिवसांपूर्वीच उपशाखाप्रमुखपद देण्यात आले होते. रात्री ९.३० च्या सुमारास आकुर्ली येथे दुचाकीवरुन दोन हल्लेखोर आले होते. या हल्लेखोरांनी सावंत यांच्यावर चार गोळ्या झाडल्या. गोळ्या झाडून हल्लेखोर घटनास्थळावरुन पसार झाले. जखमी झालेल्या सावंत यांनी उपचारासाठी नजिकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. सचिन सावंत यांच्यावर आधीही प्राणघातक हल्ले झाले असल्याची माहिती समोर आली आहे.



# २०११पर्यंतच्या झोपड्यांच्या मान्यतेसाठी कायदा



**मुंबई - 'राज्यातील सन २०११च्या झोपड्यांना अधिकृत मान्यता देण्यासाठी कायदा बनवण्यात आला असून, त्या विधेयकाचा प्रस्ताव मान्यतेसाठी राष्ट्रपतींकडे पाठवण्यात आला आहे. राष्ट्रपतींच्या मान्यतेनंतर अशा झोपड्यांना कायदेशीर मान्यता देण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिले. त्यामुळे बेकायदा झोपड्यांना लवकरच दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत.**

मुंबई-पुण्यासह राज्यातील प्रमुख शहरांतील २०११ सालापर्यंतच्या झोपड्यांना कायदेशीर मान्यता द्यावी तसेच झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत संबंधित लाभार्थींना ४०० चौरस फुटांचे घर देण्यात यावे या दोन प्रमुख मागण्यांसाठी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पक्षाच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी मुख्यमंत्री फडणवीस यांची सह्याद्री अतिथीगृहात भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी मोठ्या शहरांना प्रामुख्याने भेडसावणाऱ्या बेकायदा झोपड्यांबाबतच्या प्रश्नावरील उपाययोजनांची माहिती सादर केली. या बैठकीतच मुख्यमंत्र्यांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतचीही माहिती दिली. 'झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत किमान ३० मीटर ते ४० चौ. मीटरपर्यंतचे घर देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. शक्य आहे तेथे ४०० चौरस फुटांची घरे देण्याचा निर्णयही सरकारने घेतला आहे', अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. मुंबई व मोठ्या शहरांतील हे दोन मोठे प्रश्न सोडवण्यासाठी सरकारने घेतलेल्या या पवित्र्यामुळे घरांचा प्रश्न सुटण्यासही मदत होणार आहे.

# आणखी किती बळी जाणार?

## मुंबई उपनगरी रेल्वे मार्गावर अपघात सत्र कायम; सुरक्षा प्रयोगही फसले

**गर्दीच्या वेळी लोकलमधून पडून अनेक प्रवाशांना अपघातांना सामोरे जावे लागत आहे. गुरुवारी एक २३ वर्षीय तरुणी लोकलमधून पडून गंभीर जखमी झाली. या घटनेनंतर पुन्हा एकदा लोकलच्या गर्दीतील प्रवासातून सुटका करण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपायांवर प्रश्न उपस्थित झाला आहे. २०१६ आणि २०१७ या वर्षात मिळून लोकल आणि लांब पल्ल्याच्या गाडीतून पडून एक हजार ३११ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची नोंद लोहमार्ग पोलिसांकडे आहे.**

नोव्हेंबर २०१५ मध्ये डोंबिवलीला राहणाऱ्या भावेश नकाते या २१ वर्षीय तरुणाचा गर्दीमुळे लोकलमधून पडून मृत्यू झाला होता. या घटनेनंतर अपघात रोखण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजनांसाठी रेल्वेकडून एक समिती स्थापन करण्यात आली आणि या समितीकडून अनेक उपाय सुचविण्यात आले. त्यानंतर मध्य रेल्वेने गर्दीच्या वेळी कल्याण येथून सीएसएमटीकडे जाणाऱ्या मेल-एक्स्प्रेसमधून प्रवाशांना प्रवास करण्याची मुभा दिली. यासाठी तिकिटाप्रमाणेच कूपन्सही देण्यात आले. मात्र हा प्रयोग फसला. त्यानंतर लोकल गाड्यांमधील आसने कमी करून डब्यात प्रवाशांना उभे राहण्यासाठी जास्तीत जास्त जागा निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र त्यातही मध्य रेल्वेला अपयशच आले. या दोन प्रयोगांनंतर सामान्य लोकल गाड्यांच्या डब्यांना पश्चिम आणि मध्य रेल्वेकडून स्वयंचलित दरवाजा बसविण्याचा प्रयोग करण्याचा निर्णयही घेण्यात आला. मात्र हा प्रयोगही मागे पडला. त्यामुळे अद्यापही लोकलच्या गर्दीमुळे पडून होणाऱ्या अपघातांना आळा बसू शकलेला नाही. मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावर २०१७ मध्ये विविध अपघातांत ३,०१४ प्रवाशांचा मृत्यू झाला. यापैकी ६५४ प्रवासी लोकलमधून पडून मृत्युमुखी पडल्याचे उघड झाले आहे. तर तब्बल १,४३४ प्रवासी जखमी झाले. २०१६ मध्येही हीच परिस्थीती राहिली होती. ६५७ प्रवाशांचा लोकल गाडीतून पडून मृत्यू झाल्याची नोंद लोहमार्ग पोलिसांकडे आहे. यामध्ये लांब पल्ल्याच्या गाडीतूनही पडून मृत्यू किंवा जखमी झालेल्या प्रवाशांची नोंद फार कमी आहे.

***रूळ ओलांडताना १,६५१ जणांचा मृत्यू***

रूळ ओलांडून होणाऱ्या अपघातानाही आळा घालण्यात रेल्वेला अपयशच आले आहे. २०१७ मध्ये रूळ ओलांडताना १,६५१ जणांचा लोकलच्या आणि लांब पल्ल्याच्या गाडीच्या धडकेत मृत्यू झाला आणि ३७६ जखमी झाले आहेत. २०१६ मध्ये अशाच प्रकारच्या घटनेत एक हजार ७९८ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. रुळाजवळ संरक्षक भिंत बांधणे किंवा दोन रुळांमध्ये तारांचे कुंपण उभारण्यात येत आहे. मात्र रुळाच्या शेजारीलच झोपड्यांजवळ असलेल्या संरक्षक भिंतींना भगदाड पाडून शॉर्टकटचा मार्गही शोधण्यात आलेला असतो. त्यामुळे अपघात होतात.

२०१७ मध्ये ठाणे स्थानक आणि त्यादरम्यान विविध अपघातांत मृत्यू आणि जखमी प्रवाशांची संख्या २९२ एवढी होती.



कल्याण स्थानक आणि त्या हद्दीत २५८, अंधेरी स्थानकात २२० आणि बोरिवली स्थानकात २०३ प्रवाशांचे अपघात झाले आहेत. दिवा स्थानकातही १४९ प्रवाशांना प्राण गमवावे लागले आहेत.

***वातानुकूलित लोकलमुळे अपघातांना आळा?***

वातानुकूलित लोकल गाड्या आणण्याचा निर्णय रेल्वेने घेतला. मात्र एक गाडी सेवेत येण्यासाठी बराच वेळ गेला आणि त्याची चाचणी घेऊन ताफ्यात दाखल करण्यासाठीही विलंबच झाला. या गाड्यांना असणाऱ्या स्वयंचलित दरवाजामुळे लोकलमधून पडून होणाऱ्या अपघातांना आळा बसू शकतो. त्यामुळे जास्तीत जास्त वातानुकूलित लोकल गाड्या आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. २१० वातानुकूलित लोकल गाड्या येत्या काही वर्षांत येणार आहेत.

# वाढत्या उष्म्यामुळे मुंबईकर तापाने फणफणले



**मुंबई** - वाढत्या उष्म्यामुळे त्वचारोग, डोळ्यांच्या विकारामध्ये वाढ झाली असताना संसर्गजन्य तापाचाही जोर शहरात वाढला आहे. डोकेदुखी, अंगदुखी, डोळे लाल होणे, तापाचा जोर वाढत जाणे यासारखी लक्षणे या तापामध्ये दिसत आहे. हा ताप वातावरणातील बदलामुळे असल्याचे निदान डॉक्टरांनी केले आहे. हवेमध्ये विषाणूजन्य तापाला पूरक असणारे जंतू असतात. वाढत्या उष्म्यामुळे या विषाणूंची वाढ वेगाने होते. खासगी आणि सार्वजनिक रुग्णालयांमध्ये अशा प्रकारचा ताप असलेली रुग्णसंख्या वाढत असल्याचे निरीक्षण डॉक्टरांनी नोंदवले. मलेरिया, डेंग्यू सारख्या तापांमध्ये दिलेल्या औषधांचा कोर्स पूर्ण करायची पथ्ये रुग्ण पाळतात, मात्र संसर्गजन्य तापामध्ये ही औषधे पूर्ण घेतली जात नहीत. त्यामुळे ताप गेला तरीही ॠतूमानातील बदलामुळे ताप पुन्हा येण्याची शक्यता असते. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, महिलांना तापाची लागण लवकर होते, या घटकांत रोगप्रतिकारशक्ती कमी असल्यामुळे संसर्गजन्य तापाची लागण लवकर होताना दिसते. पावसाळ्यामध्ये स्वच्छ व शुद्ध पाण्याचा आग्रह धरला जातो. पाणी उकळून गार करून प्यायले जाते. या कालावधीमध्येही उकळून गार केलेलेच पाणी प्यायला हवे. रस्त्यावरील दूषित बर्फ असलेल्या थंडगार सरबतांमधून संसर्ग वाढतो. विषाणूजन्य अतिसारामध्ये पोटात दुखणे, जुलाब लागणे, उलट्या होण्याच्या तक्रारी अधिक असतात. पोटदुखीमुळेही अंगदुखी, ताप येण्याच्या तक्रारी वाढताना दिसत आहेत.

# धोबीघाटाने घेतला मोकळा श्वास



## अवैध बांधकामांवर पोलिसांच्या मदतीने पालिकेची कारवाई

**मुंबई -महालक्ष्मीच्या धोबीघाटमध्ये उभारलेल्या अवैध बांधकामांवर महापालिकेने शुक्रवारी हातोडा चालवला. त्यामुळे अखेर धोबीघाटाने मोकळा श्वास घेतला. धोबीघाट परिसरात पाच ठिकाणी विविध प्रकारची अवैध बांधकामे करण्यात आली होती. ही सर्व बांधकामे पोलिसांच्या मदतीने पालिकेने जमीनदोस्त केली आहेत.**

महालक्ष्मी रेल्वे स्थानकाजवळ असणारा धोबीघाट मुंबईत येणाऱ्या देशी-परदेशी पर्यटकांचे आकर्षण आहे. गेली सुमारे १२५ वर्ष सुरू असलेल्या परिसरात कपडे धुण्यासाठी अनेक जागा आहेत, तशाच अनेक छोट्या पायवाटा देखील आहेत. मात्र, गेल्या काही महिन्यांमध्ये या पायवाटांवर अतिक्रमणे तर काही हौदांवर अवैध बांधकामे झाली होती. काही ठिकाणी अवैध शेडदेखील उभारण्यात आले होते. त्यामुळे या धोबीघाट परिसरात कपड्यांचे गाठोडे घेऊन येणाऱ्या जाणाऱ्यांना चालण्यास अडथळे येत होते. याबाबत पालिकेच्या जी-दक्षिण विभागाने शुक्रवारी कारवाई केली.

धोबीघाटावर दररोज हजारोंच्या संख्येने कपडे धुतले जातात. यासाठी धोबीघाटमध्ये पाण्याचे हौद, कपडे धुण्यासाठी ओटे, यासह पाणी वाहून जाण्यासाठीच्या सुविधा आहेत. त्याच परिसरात हे अतिक्रमण करण्यात आले होते. या परिसरातील अंतर्गत पायवाटा या चिंचोळ्या असल्याने तिथे जेसीबी, पोकलेन यासारखी यंत्रसामुग्री नेणे शक्य नव्हते. त्यामुळे कारवाई करताना हॅण्ड कटर, कुदळ, फावडे, हातोडा यासारखी पांरपरिक हत्यारे व साधने वापरण्यात आली, अशी माहिती पालिकेच्या जी-दक्षिण विभागाचे सहाय्यक आयुक्त देवेंद्र जैन यांनी दिली. या कारवाईसाठी मुंबई महापालिकेचे ४६ कामगार, कर्मचारी, अधिकारी कार्यरत होते.

# एसटी भाडेवाढीच्या उंबरठ्यावर

## डिझेल दरवाढीचा परिणाम; १० ते १५ टक्के वाढीच्या प्रस्तावावर विचार

मुंबई : डिझेल दरात सातत्याने होणाऱ्या वाढीमुळे एसटीच्या दैनंदिन खर्चावर मोठा परिणाम होत आहे. परिणामी एसटी महामंडळाकडून प्रवाशांच्या खिशातूनच वाढणारा खर्च काढला जाणार आहे. महामंडळाकडून १० ते १५ टक्क्यांपर्यंत भाडेवाढीच्या प्रस्तावावर काम सुरू असून एसटीच्या बोर्डाच्या बैठकीत सादर केल्यानंतर प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी लवकरच राज्य परिवहन प्राधिकरणाकडेही पाठविण्यात येणार आहे. १० टक्क्यांपर्यंत भाडेवाढ झाल्यास ३ ते ५० रुपयांपर्यंत अधिक प्रवासभाडे मोजावे लागतील आणि १० टक्क्यांपेक्षा जास्त भाडेवाढ झाली तर जास्तीत जास्त



५० रुपयांपेक्षा अधिक तिकिटदरांत फरक होणार आहे.


डिझेल दराचा भार वाढलेला असतानाच कामगारांच्या महागाई भत्त्यातही वाढ झाली आहे. २०१४ ला १०७ टक्के असलेला महागाई भत्ता २०१८ मध्ये १३६ टक्क्यांपर्यंत द्यावा लागत आहे. याबरोबरच २०१६-१७ चा प्रलंबित कामगार वेतन कराराचा बोजाही महामंडळावर पडणार आहे. या वाढीव खर्चामुळे एसटी महामंडळाच्या तिजोरीत मात्र फारशी भर पडत नाही. २००७-०८ मध्ये १६८ कोटी रुपयांनी नफ्यात आलेले एसटी महामंडळ हळूहळू तोट्यात चालले आहे. २०१७-१८ मध्ये वार्षिक ५४४ कोटी रुपये तोटा होत असून संचित तोटा दोन हजार ३०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. यामुळे भाडेवाढीशिवाय पर्याय राहिलेला नाही.

त्यासाठी महामंडळाने १० ते १५ टक्के भाडेवाढीच्या प्रस्तावावर काम सुरू केले आहे. मागील भाडेवाढ ३१ जुलै आणि २२ ऑगस्ट २०१४ रोजी दोन टप्प्यांत झाली आणि ती एकूण १४ टक्के होती. एकंदरीतच सध्याची परिस्थिती पाहता भाडेवाढ करण्याचा गांभीर्याने विचार केला जात आहे. भाडेवाढीचा प्रस्ताव तयार करून प्रथम एसटी महामंडळाच्या बोर्डाच्या बैठकीत ठेवण्यात येणार आहे.

***भाडेवाढ अशी***

१० टक्क्यांपर्यंत भाडेवाढ झाल्यास तीन रुपये ते ५० रुपयांपर्यंत प्रवासदर वाढू शकतो. त्यामुळे मुंबई ते पुणे साध्या बसचे असलेले भाडे १६० रुपयांवरून १७५ पर्यंत जाईल, तर शिवनेरीच्या भाड्यातही कमीत कमी १५ आणि जास्तीत जास्त ५० रुपयांपर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे. जर भाडेवाढ १५ टक्क्यांपर्यंत झाली तर एसटीच्या भाड्यात त्यापेक्षाही अधिक वाढ होईल.

# ध्वनिनियमांचे उल्लंघन झाल्यास कारवाई



मुंबई - न्यायालयाचा आदेश असूनही गेल्या वर्षी गणेशोत्सवादरम्यान ७८ मंडपांपैकी ४२ बेकायदा मंडपांवर कारवाई केली नसल्याने मुंबई महापालिका आयुक्त अजय मेहता यांच्याविरुद्ध न्यायालय अवमानाबद्दल काढलेली 'कारणे दाखवा' नोटीस मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी मागे घेतली. मात्र, त्याचवेळी आयुक्तांनी आदेशाचे उल्लंघन हेतूपूर्वक केले नसल्याने नोटीस मागे घेण्यात येत असली तरी यापुढे कोणत्याही धार्मिक उत्सवांदरम्यान न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन झाल्यास त्याकडे अत्यंत गांभीर्याने पाहून न्यायालय अवमानाबद्दल कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही न्यायालयाने दिला. 'आयुक्त मेहता यांचे प्रतिज्ञापत्र पाहता न्यायालयाच्या पूर्वीच्या काही आदेशांचे पालन झाले नसल्याचे स्पष्ट होत आहे. मेहता दिलेले स्पष्टीकरण त्यांनी हेतूपूर्वक उल्लंघन केले नसल्याचे स्पष्ट होते. केवळ त्या कारणाने त्यांच्याविरुद्धची नोटीस मागे घेत आहोत. मात्र, यापुढे न्यायलयीन आदेशांचे उल्लंघन झाल्यास न्यायालयाचा अवमान म्हणून त्याकडे अत्यंत गांभीर्याने पाहिले जाईल', असे खंडपीठाने आदेशात स्पष्ट केले.

# 'भाजपामुळे २१ लाख ८२ हजार ५२५ लोकांना धान्य मिळत नाही'



**मुंबई :** मुंबईमध्ये ५४ लाख असे लोक आहेत ज्यांना रेशन कार्डवर धान्य मिळते, मात्र २१ लाख ८२ हजार ५२५ लोकांना आधार कार्ड लिंक नसल्यामुळे धान्य मिळत नाही. जे लाभार्थी आहेत पण त्यांचे आधार कार्ड रेशन कार्डशी लिंक झालेले नाही. त्यामुळे त्यांचा अंगठा मशीनशी जुळत नाही. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला होता की, आधार कार्डला रेशन कार्डशी लिंक करण्याची सक्ती नको; मात्र तरीदेखील भाजपा सरकारने सक्ती केली आहे. त्यामुळे मुंबई, ठाणे, भिवंडीतील जनतेला ३ ते ४ महिने धान्य मिळत नाही, असा आरोप कॉँग्रेसचे मुंबई अध्यक्ष संजय निरुपम यांनी गुरुवारी आयोजित पत्रकार परिषदेत केला.

संजय निरुपम म्हणाले, रेशन दुकानातील ईपोस मशीन खराब आहेत. काही ठिकाणी मशीन बंद पडल्या आहेत. अनेक ठिकाणी नेटवर्कची मोठी समस्या आहे, त्यामुळे या मशीन चालत नाहीत. आधार कार्डला रेशन कार्डशी लिंक करण्याचे काम फक्त ५० टक्केच पूर्ण झाले आहे. त्यामुळे जोपर्यंत आधार कार्ड रेशन कार्डशी लिंक करण्याचे काम संपूर्ण होत नाही, जोपर्यंत सर्व ईपोस मशीन व्यवस्थित सुरू होत नाहीत, तोपर्यंत भाजपा सरकारने हा निर्णय मागे घ्यावा. मुंबई आणि ठाण्यामध्ये ४ हजार २०० रेशन दुकाने आहेत. ऑगस्ट २०१७मध्ये मुंबई आणि ठाण्यामध्ये प्रत्येक रेशन दुकानामध्ये बायोमेट्रिक मशीन बसविण्यात आल्या आहेत, मात्र या मशीन बंद पडल्याचे समोर आले आहे. रेशन आहे, धान्य आहे, लाभार्थी आहेत.. फक्त आधार कार्ड लिंक नसल्यामुळे धान्य दिले जात नाही. परिणामी, आधार कार्ड रेशन कार्डशी लिंक करण्याचा आदेश भाजपा सरकारने मागे घ्यावा. दरम्यान, रेशन दुकानधारकांना सरकारने संरक्षण दिले पाहिजे. कारण यामध्ये त्यांची काहीच चूक नाही, असेही ते म्हणाले.

# महिला ५७ लाख, शौचालये ४ हजार!

**मुंबई** - महाराष्ट्राचा ग्रामीण भाग 'हागणदारीमुक्त' झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले असले तरी देशाच्या आर्थिक राजधानीत स्त्री-पुरुषांकरिता उपलब्ध असलेल्या शौचकुपांच्या संख्येवरून असमानतेचा वेगळाच मुद्दा समोर आला आहे. समाजाच्या विविध सामाजिक पातळ्यांवर दिसणारी स्त्री-पुरुष असमानता सार्वजनिक शौचालयांमध्येही दिसत असून शहरातील दर सहा शौचकुपांमागे स्त्रियांच्या वाटेला केवळ एक शौचकूप आले आहे. हागणदारीमुक्तीसाठी महानगरपालिकेने गेल्या वर्षभरात अनेक शौचालये बांधल्याचा दावा केला जात असला तरी वास्तवात स्त्रियांना मोकळे होण्यासाठी घराचाच आसरा घ्यावा लागत आहे. शहरातील ५७ लाख स्त्रियांसाठी अवघी ३९०९ शौचालये असून १५०० स्त्रियांसाठी केवळ एक शौचकूप किंवा मुतारी उपलब्ध आहे. प्रजा फाऊंडेशनने नागरी सेवासुविधांबाबत जाहीर केलेल्या




अहवालातून ही माहिती समोर आली आहे.

एकीकडे संपूर्ण राज्य हागणदारीमुक्त झाल्याचा दावा केला गेला असतानाच शहरातील सार्वजनिक शौचालयांची संख्या मात्र फारशी वाढलेली नाही. त्यातही पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांच्या शौचालयांची स्थिती अगदीच शोचनीय आहे. संपूर्ण शहरात पुरुषांसाठी १०,७७८ शौचकूप/ मुतारी असून स्त्रियांसाठी मात्र केवळ ३,९०९ शौचकूप आहेत. याचाच अर्थ पुरुषांच्या १०० शौचकुपांच्या तुलनेत स्त्रियांची केवळ ३४ शौचकूप आहेत. हे प्रमाणही सरासरी असून प्रत्येक वॉर्डनुसार परिस्थिती बदलताना दिसते. गिरगाव परिसर असलेल्या सी वॉर्डमध्ये स्त्रियांच्या शौचकुपांचे प्रमाणे अवघे १५ टक्के असून दहिसर परिसरातील आर उत्तर प्रभागात स्त्रियांच्या शौचकुपांचे सर्वाधिक म्हणजे केवळ ५० टक्के प्रमाण आहे. जनगणनेनुसार शहरात स्त्रियांची संख्या ५७ लाख २६ हजार आहे. याशिवाय नवी मुंबई, ठाणे, विरार परिसरांतून दररोज मुंबईत काही लाख स्त्रिया येतात. त्यांची संख्या गृहीत धरता दोन हजारांहून अधिक स्त्रियांसाठी केवळ एक शौचकूप उपलब्ध आहे. सार्वजनिक शौचालये ही आवश्यक बाब असतानाही शौचालयांबाबत स्त्री-पुरुष असमानता स्पष्ट दिसत आहे. याशिवाय एकंदर लोकसंख्येच्या तुलनेतही शौचकुपांची संख्या अगदीच कमी आहे, असे प्रजा फाऊंडेशनचे प्रकल्प संचालक मिलिंद म्हस्के यांनी सांगितले.

# पालिकेच्या लाचखोर सहायक अभियंत्याकडे करोडोंचे घबाड

**मुंबई** : मुंबई पालिकेला वॉटर प्युरीफायर मशीन पुरवणाऱ्या कंत्राटदाराकडून ५० हजारांची लाच घेताना अटक केलेल्या सहायक अभियंता प्रमोद भोसले याच्या मुलुंड येथील घरावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) शुक्रवारी छापा टाकला. भोसले याच्या घरातून २० लाख ४९ हजारांच्या रोख रकमेसह विविध



२३ बँक खाती, पतपेढ्यांमधील शेअर्स, विमा पॉलिसी, मुदत ठेवींची प्रमाणपत्रे असे करोडोंचे घबाड सापडले.

मुंबई पालिकेत यांत्रिकी आणि विद्युत विभागात प्रमुख अभियंता म्हणून कार्यरत असलेल्या लाचखोर भोसलेने पालिकेला वॉटर प्युरीफायर मशीन पुरविण्याचे काम करणाऱ्या कंपनीचे बिल थकविले होते. तक्रारदार कंत्राटदाराचे थकीत १ कोटी ८० लाख ३० हजारांचे बिल मंजूर करुन देण्यासाठी त्याने ३ लाखांची मागणी केली. याप्रकरणी कंत्राटदाराने एसीबीकडे तक्रार दिली. त्यानुसार एसीबीचे अप्पर पोलीस आयुक्त केशव पाटील, पोलीस उपायुक्त रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने तपास सुरू केला. एसीबीने सापळा रचून ५० हजार रुपयांची लाच घेतना गुरुवारी भोसलेला अटक केली.

# मुंबईत सराईत घरफोडी करणाऱ्या दुकलीला बेड्या

**मुंबई** - उंच इमारतींच्या भिंतीवरून चढून खिडकीवाटे घरात शिरून घरफोडी करणाऱ्या आनंद सकपाळ (२०), गणेश देवकर (२०) या दुकलीला घाटकोपर पोलिसांनी अटक केली. त्यांनी आतापर्यंत ११ घरफोडीचे गुन्हे केल्याचे समोर आले आहे. त्यांच्याकडून ५ लाख ८५ हजार किमतीचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत. मुंबई, ठाणे तसेच नवी मुंबई परिसरात उंच इमारतींच्या खिडकीतून प्रवेश करत घरफोड्या करण्याचे प्रकार वाढले होते. त्यामुळे घाटकोपर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक व्यंकट पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी विलास दातीर, मैत्रानंद खंदारे, अशोक भोसले आणि अंमलदार यांनी यासंदर्भात तपास सुरू केला. या तपासात पथकाला या



आरोपींची माहिती मिळाली. त्यानुसार, पोलिसांनी सापळा रचून दोघांना बेड्या ठोकल्या. त्यांच्या झडतीत तब्बल ५ लाख ८५ हजार रुपये किमतीचे चोरीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. आरोपींनी घाटकोपरसह कांदिवली, एन.एम. जोशी मार्ग, माटुंगा, वर्सोवा, गोरेगाव, बीकेसी परिसरात ११ गुन्हे केल्याची कबुली दिली. त्यांनी आतापर्यंत १००हून अधिक गुन्हे केले असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

# ११ वर्षीय मुलीवर वृद्धाचे अत्याचार

**मुंबई** - आग्रीपाडा येथे मोहम्मद तांबे या ६० वर्षांच्या वृद्धाने ११ वर्षीय मुलीवर गेल्या तीन ते चार महिन्यांपासून लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पोलिसांनी त्यास अटक केली आहे.

या मुलीस चॉकलेटचे आमिष दाखवून तांबे तिच्यावर अत्याचार करत होता. कुणाला याबाबत सांगितल्यास ठार मारण्याची धमकी देत असल्याने ही मुलगी अत्याचार सहन करत होती. कुटुंबापासून वेगळा राहणारा तांबे खासगी कंपनीत नोकरीस होता. तीन दिवसांपूर्वी इमारतीजवळ या मुलीशी अत्याचार करताना त्याला काही रहिवाशांनी पाहिले. त्यांनी मुलीच्या पालकांना ही बाब सांगितल्यावर त्यांनी आग्रीपाडा पोलिस ठाण्यात धाव घेतली. यानंतर तांबेने परिसरातून पळ काढला. परंतु, पोलिसांनी त्यास शोधून अटक केली.

## संपादकीय...

# नाणार खरेच येणार ?



संपादकः-
दिपक मोरेश्वर नाईक

**एकीकडे स्थानिक०। तीव्र बनत असताना आणि लोकांच्या इच्छेविरुद्ध निर्णय घेतला जाणार नाही, अशी ग्वाही महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी दिली असतानाही केंद्रातील मोदी सरकारने रत्नागिरी रिफायनरी आणि पेट्रोकेमिकल्स (आरआरपीसीएल) या तीन लाख कोटी रुपयांच्या तेलशुद्धीकरण प्रकल्पासाठी सौदी अरेबियाच्या सौदी अरमाको या कंपनीसोबत करार केला. मच्छिमारी, हापूस उत्पादन आणि पर्यटन या कोकणच्या तिन्ही वैभवांना मातीत मिसळणारा हा प्रकल्प असल्याची जनसामान्यांची भावना आहे आणि त्याला शास्त्रीय आधारसुद्धा सांगितला जातो. परंतु केंद्रसरकारने लोकभावना भिरकावून दिल्या आणि इंडियन ऑइल, हिंदुस्थान पेट्रोलियम आणि भारत पेट्रोलियम या भारतीय तेल कंपन्यांनी सौदी अरमाकोसोबत प्रकल्प उभारण्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. कोणत्याही प्रकल्पाला स्थानिक रहिवासी विरोधच करीत असतात आणि प्रत्येकवेळी स्थानिकांच्या भावना विचारात घेतल्या तर कोणताही विकासप्रकल्प राबवता येणार नाही, अशी साधारणपणे राज्यकर्त्यांची धारणा असते. सरकार विकासाचे भुकेले असते आणि लोकांनाच विकास नको असतो किंवा सरकार ज्या उदारपणे विकासाकडे पाहात असते तशा दृष्टीचा लोकांकडे अभाव असतो, असे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. नाणारचा पेट्रोकेमिकल प्रकल्प असला, तरी त्याचे गुलाबी चित्र निर्माण करण्यासाठी त्याला ग्रीन रिफायनरी अशा गोंडस नावाने त्याला संबोधले जात आहे. परंतु त्यामुळे वस्तुस्थितीत फरक पडत नाही. या प्रकल्पामुळे दहा लाख रोजगार उपलब्ध होणार असल्याचे सांगण्यात येते. परंतु सोळा गावांचे विस्थापन करून आणि इथल्या नैसर्गिक संपदेचा विध्वंस करून हे सगळे उपलब्ध होणार असल्याचे वास्तव दडवले जाते. रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील चौदा गावांच्या परिसरातील साधारण साडेपाच हजार हेक्टर आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यातील दोन गावांतील सुमारे सहाशे हेक्टर जमीन संपादित करण्यात येणार आहे. साडेसातशे कुटुंबे विस्थापित होणार आहेत. आंब्यांच्या जगात देवगड हापूसची प्रतिष्ठा सर्वमान्य आहे, या प्रकल्पामुळे देवगड हापूसचा संपूर्ण पट्टाच नाहीसा होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरवर्षी इथून दोन ते अडीच लाख पेट्या आंबे बाहेर जातात, तेवढ्या आंबा उत्पादनाला फटका बसण्याची शक्यता वर्तवली जाते. मच्छिमारी हा या परिसरातला आणखी एक महत्त्वाचा व्यवसाय असून त्याच्यावरही गंडांतर आल्यावाचून राहणार नाही. प्रकल्पामुळे समुद्रात संबंधित बोटींची वाहतूक वाढेल त्याचा फटका मच्छिमारांना बसेल हे झाले एक. प्रदूषणाचा मासेमारीवर परिणाम होणार तो वेगळाच. पर्यटनासंबंधाने बोलायचे, तर क्रूड ऑइलचे टर्मिनस विजयदुर्ग किल्ल्यालगतच होणार आहे. आज स्थानिक रहिवासी आणि पर्यावरण अभ्यासक मांडत असलेले हे धोके खरे असले तर आंबा, मच्छिमारी आणि पर्यटन या तिन्हींच्या मुळावर येणारा हा प्रकल्प असल्याचे स्पष्ट दिसते. कोणत्याही प्रकल्पामुळे पर्यावरणाला थोडीफार झळ पोहोचणार हे खरे असले, तरीसुद्धा अशा प्रकारचे घातक प्रकल्प कोकणासारख्या निसर्गसंपन्न परिसरात आणण्यामध्ये कोणत्याही प्रकारचे शहाणपण नाही. परंतु सरकारला आपली कार्यक्षमता कागदोपत्री दाखवायची असते त्यामुळे असे करार केले जातात. जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पामुळे दहा वर्षांहून अधिक काळ संघर्ष सुरू आहे. जैतापूरपासून जेमतेम पंधरा किलोमीटर अंतरावर हा प्रकल्प उभारण्यात येत आहे, म्हणजे भविष्यातील धोका अनेक पटींनी वाढणारा आहे. अशा प्रकल्पांच्या निमित्ताने राजकीय पक्षांना मात्र राजकारण करण्याची भरपूर संधी मिळते. शिवसेना नेहमीच आपण कोकणच्या जनतेसोबत असल्याचा दावा करीत असते. परंतु राज्यात शिवसेनेचे उद्योगमंत्री असताना या प्रकल्पाच्या दिशेने सरकारची सकारात्मक पावले पडतात. केंद्र सरकारने करार केल्यानंतरही, शिवसेनेचा प्रकल्पाला विरोध असल्याचे केंद्रीय अवजड उद्योगमंत्री सांगतात. यातून त्यांचा फक्त दुटप्पीपणाच दिसून येतो. नारायण राणे यांची अवस्था याहून फारशी वेगळी नाही. या सगळ्यांना आपापले राजकारण करायचे आहे आणि ते करताना ज्या बाजूला अधिक फायदा दिसेल तिकडे ते जातील. आणि ती बाजू बव्हंशी सरकारची असू शकते, हे वेगळे सांगायला नको. त्यामुळे याप्रश्नीचा लढा स्थानिकांना स्वतःच्या हिंमतीवरच लढावा लागेल, हे लक्षात घ्यायला पाहिजे.**

# जोंधळे यांचा वैचारिक गोंधळ?



लेखकः रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे महासंचालक

-रवींद्र माधव साठे

**रविवार, १२ नोव्हेंबर रोजी बी. व्ही. जोंधळे यांचा 'बौद्ध धर्म व आक्रमक इस्लामी : दुसरी बाजू' हा लेख प्रसिद्ध झाला आहे. माझ्या ५ नोव्हेंबर रोजी प्रकाशित झालेल्या मूळ लेखास प्रतिवाद करणारा सदर लेख आहे. हा लेख वाचल्यानंतर असे लक्षात येते की, मी मूळ लेखात पुराव्यासहित उपस्थित केलेल्या मुद्द्यांना तात्त्विक उत्तरे जोंधळे यांच्या लेखात नाहीत. त्यांच्या लेखात पुरावे नगण्य व पूर्वग्रहदूषित मते अधिक दिसतात.**

***जोंधळे यांनी उपस्थित केलेले मुद्दे व त्यांचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे..***

१. इस्लामी आक्रमणामुळे बौद्ध धर्म लोप पावला हे अर्धसत्य आहे.

२. साठे यांनी हा लेख बुद्ध धर्माच्या प्रेमापोटी नव्हे, तर इस्लामच्या द्वेषापोटी लिहिला आहे.

३. इस्लाम समतावादी आहे व इस्लामने समता कुठे नाकारली?

४. लेखाचा उद्देश बौद्ध व मुस्लीम समाजांत दुरावा निर्माण करणे वगरे.

५. केंद्र सरकार बुद्ध धर्माला राजाश्रय मिळवून देईल काय?

पं. नेहरूंच्या काळापासूनच इथला खरा इतिहास लपविण्याचे धोरण चालू आहे. या देशातील नागरिकांना खरा इतिहास जर कळणार असेल तर त्यात वावगे ते काय? इतिहासातील मढी उकरून काढण्याचा इथे प्रश्नच उद्भवत नाही. येथील सवर्णांनी दलित समाजाची उपेक्षा केली, त्यावर अन्याय केला हा सत्य इतिहास आहे. तसेच इस्लामच्या आक्रमणामुळे बौद्ध धर्माचा लोप झाला हेही वास्तव जनतेपुढे आले तर त्यास आक्षेप का?

सरकारांच्या कृपेने एनसीईआरटी, आयसीएचआर, यूजीसीसारख्या संस्थांमध्ये गेली तीन दशके मार्क्सवादी मंडळी मोठ्या जागा अडवून होती. आपल्या अधिकाराचा वापर करून शैक्षणिक अभ्यासक्रमातून आजपर्यंत जी माहिती या मंडळींनी खपविली आहे, ती वरवर पाहिली तरी भारताच्या इतिहासाशी त्यांनी चालवलेला राजकीय खेळ लगेच समजेल.

नेहरू गझनीबद्दल लिहितात.. 'गझनीने मथुरेचे मंदिर पाहिले. त्याला ते बांधकामाचे एक आश्चर्य वाटले. त्याने त्याची स्तुती केली. भक्तांच्या श्रद्धेइतके भक्कम व सुंदर हजार इमले येथे आहेत. हे सर्व काम पूर्ण होण्यासाठी निदान २०० वर्षे तरी लागली असतील. लक्षावधी दिनार खर्च झाले असतील.' नेहरूंच्या वर्णनापाशी थांबायचे तर गझनी हा आक्रमक नव्हता, तर तो कलाकृतीचा उपासक होता असेच मानावे लागेल. व्हिन्सेंट स्मिथ हे इतिहासकार आपल्या 'हिस्टरी ऑफ इंडिया' या ग्रंथात लिहितात की, 'मुहम्मद गझनीची नंतरची धाड मथुरेतल्या पवित्र कृष्ण मंदिरावर पडली.. मूर्तीपैकी पाच मूर्ती तळपत्या सुवर्णाच्या होत्या. पाच-पाच यार्ड उंचीच्या मूर्तींच्या डोळ्यांच्या जागी अमूल्ये रत्ने होती. ही सगळी मंदिरे नाफ्ता ओतून भस्मसात करावीत, असा आदेश गझनीने त्याच्या सनिकांना दिला (पृष्ठ क्र. २०७)

एम. एन. रॉय 'रोल ऑफ इस्लाम' या पुस्तकात लिहितात की, हिंदू समाजातील विषमतेला कंटाळून खालच्या जातींनी इस्लामला कवटाळले. रॉय यांच्या मते इस्लाममध्ये समता होती. अर्थात मुस्लीम आक्रमकांनी भारतात अनन्वित अत्याचार केले हा भाग इथे गौण ठरतो. कारण एक प्रकारे इस्लामने अत्याचार करून अत्याचार करणाऱ्यांना अत्याचाराचा खरा अर्थच शिकवला होता. अत्याचार करताना खालच्या जातींना वगळले गेले असे सर्वांनी येथे गृहीत धरावे. इस्लाममध्ये समता आहे वा होती असे लिहिणे खरे तर वावदूकपणाचे आहे. कारण मुस्लीम आक्रमक जेथे जेथे जात तेथील एक तर हजारो निरपराधांना ते ठार करीत. त्यांच्या मुंडक्यांच्या राशी रचीत, कत्तल करून झाली की तेथील स्त्री-पुरुष, बालकांना इस्लामची दीक्षा देत. त्यानंतर देशोदेशीच्या गुलामांच्या बाजारात त्यांची विक्री करीत. तसे कागदोपत्री उल्लेख आहेत. या वर्तनाला समतेचे दर्शन म्हणावयाचे काय?

इस्लामच्या आक्रमणाच्या १३ शतके आधी भारतात बुद्ध धर्म होता. अनेकांच्या मते हा धर्म समतावादी होता. असे असूनही येथील खालच्या जातींनी समतेच्या ओढीने बौद्ध धर्माचा स्वीकार का केला नाही? हाही एक संशोधनाचा विषय आहे. 'पाकिस्तान ऑर पार्टशिन ऑफ इंडिया' या आपल्या सुप्रसिद्ध ग्रंथात बाबासाहेबांनी या विषयावर एक पूर्ण प्रकरण लिहिले आहे. त्या प्रकरणाचे नाव आहे सोशल स्टॅग्नेशन. या प्रकरणाच्या पहिल्या पानावरचे त्यांचे वाक्य असे आहे –

''केवळ हिंदूंत सामाजिक वैगुण्ये आहेत आणि मुस्लिमांत नाहीत हा भ्रम आहे, असा कोणता सामाजिक दुर्गुण आहे जो हिंदूंत आहे आणि मुस्लिमांत नाही.'' (प्रकरण ८, पृष्ठ क्र. ८-२२५)

बालविवाह इत्यादी सामाजिक दुर्गुण हिंदू आणि मुस्लीम अशा दोघांतही आहेत हे त्यांनी सांख्यिकी आधाराने दाखवले आहे. इस्लाम धर्मातील विषमता, गुलामी आणि जातिव्यवस्था याबद्दल बाबासाहेब लिहितात – ''इस्लाम बंधुत्वाची भाषा करतो. सर्वांना वाटते की जणू इस्लाममध्ये गुलामी नाही.. आज गुलामी जगभरातून गेली असली तरी जेव्हा गुलामी होती तेव्हा तिच्या समर्थनाचा प्रारंभ इस्लाम धर्म आणि इस्लामिक देशांतून झाला होता.'' (८-२२८)

इस्लाम धर्मात गुलामी आणि विषमतेची मुळे आहेत यावर चर्चा करताना आंबेडकर म्हणतात, ''गुलामांना माणुसकीने वागवा असे प्रेषित कुराणात म्हणतो, पण त्यांना मुक्त करा असे म्हणत नाही. इस्लाम धर्मानुसार गुलामांना मुक्त करण्याचे बंधन मुस्लिमांवर नाही. गुलामाला चांगले वागवत (!) गुलाम ठेवणे हा उल्लेख आंबेडकरांनी जाणीवपूर्वक केला आहे. धर्मातील विषमता ही वेगवेगळी रूपे घेत टिकून राहते. इस्लाम धर्मात गुलामी असल्याने ती विषमतेच्या रूपाने टिकून राहिली आहे, हे दाखवून देत बाबासाहेबांनी मुस्लिमांतील जातींचे भले मोठे कोष्टक पानभर दिले आहे. (८-२२९)

सर्व धर्मांची चिकित्सा करून झाल्यावर बाबासाहेबांना बुद्धाचा मार्ग योग्य वाटला होता. बुद्ध धर्माचा ऐतिहासिक उदय आणि अस्ताची त्यांनी तपशीलवार मीमांसा केली आहे. अनेक ठिकाणी त्याची वेगवेगळी कारणे दिली आहेत. माझे सर्वात शेवटचे मत प्रमाण मानावे असे त्यांनी अनेकदा आपल्या अनुयायांना निक्षून सांगितले आहे. या विषयावर त्यांनी सर्वात शेवटी २३ जून १९५६ रोजी भाषण दिले. अखिल भारतीय बौद्धजन समितीच्या दिल्लीतल्या सभेत ते म्हणाले – ''मुसलमानांनी या देशावर आक्रमण करून बौद्ध विहारांचा नाश करून, बौद्ध मूर्ती फोडल्यामुळे त्यांना बूत शिकन म्हणजे मूर्ती फोडणारे असे म्हटले जाते. बूत हा मूर्तीसाठीचा शब्द म्हणजे बुद्ध या शब्दाचे (अपभ्रंश) रूप आहे.

मुसलमानांनी बौद्ध व हिंदू धर्मावर आक्रमण केले होते. दोघांची मंदिरे उद्ध्वस्त केली होती. बऱ्याच बौद्ध भिक्खूंची कत्तल झाली आणि काहींनी देशाटन केले. त्यामुळे बौद्ध अनुयायांना आपण कोणाचे अनुकरण करावे हेच कळेनासे झाले. बौद्ध अनुयायी अंधकारात चाचपडत राहिले.'' (खंड १८-३, पृष्ठ- ४८०, ४८१)

एलिनॉर झेलिऑट हे बुद्ध धर्माचे एक मान्यताप्राप्त अभ्यासक आहेत. त्यांनी 'आंबेडकर्स कन्व्हर्जन' हे पुस्तक लिहिले आहे. बाबासाहेबांनी धर्मांतराची घोषणा केली त्या वेळी ख्रिस्ती मिशनरी व मुल्लामौलवी त्यांना भेटावयास गेले होते. आंबडेकरांच्या अनुयायांनी ख्रिस्ती व इस्लाम धर्म स्वीकारावा त्यासाठी ते आग्रही होते. मात्र बाबासाहेबांनी त्यांचे प्रस्ताव अमान्य केले, हे झेलिऑट यांनी साधार दाखवून दिले आहे. अशाच प्रकारचे उल्लेख धनंजय कीर यांनी बाबासाहेब आंबेडकरांवर लिहिलेल्या चरित्रात पृष्ठ क्र. २८४-२८५ वर आढळतात.

चां. भ. खैरमोडे यांनी बाबासाहेब आंबेडकरांवर चरित्र खंड लिहिला आहे. महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाने तो प्रकाशित करण्यास मदत केली. त्याच्या बाराव्या खंडात पृष्ठ ४४-४५ वर दिल्लीत झालेल्या बठकीत सोहनलाल शास्त्री यांच्यासमवेत बाबासाहेबांचा बौद्ध धर्म दीक्षेविषयी संवाद आहे. शास्त्री विचारतात, ''बाबासाहेब! बौद्ध धर्मापेक्षा ख्रिस्ती किंवा इस्लामी धर्म आपणाला जास्त फायदेशीर होणार नाही का?'' बाबासाहेब त्यावर म्हणतात, ''ते धर्म आपणाला फायदेशीर कदाचित होतील, पण ते भारतात निर्माण झालेले धर्म नाहीत. त्या धर्माचा आपण स्वीकार केला तर आपणाला इतर देशांतून, आपल्या लोकांच्या भौतिक उन्नतीकरिता खूप पसाही मिळेल. आपणाला भारतीय राजकारणात खूप बळही कमावता येईल. पण या सर्व गोष्टी परस्वाधीन होऊन आपणाला करता येतील. दुसऱ्यांच्या ओंजळीने दुसऱ्यांचे पाणी पिऊन आपल्या सर्वांगीण प्रगतीची तहान भागविणे हा पुरुषार्थ नव्हे. स्वतच्या हिमतीने, स्वावलंबनाने व स्वाभिमानाने आणि स्वदेशी नव्या धर्माच्या आश्रयाने आपण आपली प्रगती केली तर तो खरा पुरुषार्थ ठरेल. आणि भारतीय इतिहासात आपला पुरुषार्थ सोनेरी अक्षरांनी लिहिला जाईल. ख्रिस्ती अगर इस्लामी धर्मांनी आपली भारतीय संस्कृती नष्ट होईल. आणि जातिवंत संस्कृती राखणे हे बौद्ध धर्माचे रहस्य आहे. हे ज्यांना उमगेल तेच माझ्या धर्मदीक्षेबद्दल मनात किंतु बाळगणार नाहीत. बौद्ध संस्कृतीचे पुनरुज्जीवन करणे व सर्व भारत बौद्ध करणे हे माझे उद्दिष्ट आहे.''

बौद्ध धर्म हा भारताशिवाय अन्य देशांतही पसरला होता. तिथेही त्याचा नाश झाला. हा नाशही हिंदूंनीच केला, असे रोमिला थापर यांच्या सिद्धांताप्रमाणे मानावयाचे का?

सम्राट अशोक सोडून भारतातील कोणत्याही राजाने धर्मास राजाश्रय मिळवून दिलेला नाही. धर्म व राज्य या संकल्पना वेगळ्या असून युरोपप्रमाणे इथे राजसत्ता आणि धर्मसत्ता यामध्ये कधीच संघर्ष झाला नाही.

भारतीय संस्कृतीने द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत, ईश्वरी तत्त्व सगुण आहे, ते निर्गुण आहे, देव आहे, देव नाही (चार्वाक, बुद्ध), वेद हे अर्थहीन आहेत (कौत्स निरुक्त), बौद्ध व जैन मते अशी सर्व प्रकारची उलट-सुलट व काही परस्परविरोधी मते सामावून घेतली आहेत. 'कास्ट ॲण्ड क्लास' या आपल्या ग्रंथामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, या देशामध्ये असंख्य जाती असल्या तरी त्यांच्यामध्ये खोलवर सांस्कृतिक एकता रुजली आहे. गौतम बुद्ध आणि हिंदू धर्म या दोघांमध्ये मूलभूत फरक फारच थोडा आहे हे आनंद कुमारस्वामी व ओल्डनबर्ग या संशोधकांनी दाखवून दिले आहे. महास्थविर चंद्रमणी आणि इतर भिक्खू यांनी धर्मांतराच्या दीक्षा समारंभाच्या वेळी जे पत्रक प्रसिद्ध केले त्यात हिंदू धर्म आणि बौद्ध धर्म या एकाचा वृक्षाच्या दोन फांद्या आहेत, असे म्हटले होते. (पृष्ठ क्र. ५६०) माझ्या लेखातील विषयांची दुसरी बाजू कोणती हे जोंधळे यांचा लेख वाचल्यानंतर शेवटपर्यंत कळत नाही. एक तर जोंधळे यांचा वैचारिक गोंधळ तरी आहे किंवा सत्य पचवता येत नसल्यामुळे इतर मुद्द्यांना नाहकपणे उपस्थित करून वाचकांची दिशाभूल करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे, हे यातून सिद्ध होते.

# २६ गावांचा 'बुलेट ट्रेन'ला विरोध



**पालघर** - पालघर जिल्ह्यातील २६ गावांतून बुलेट ट्रेन जाणार असून त्यासाठी जमिनींचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले असून एकाही शासकीय अधिकाऱ्याला परिसरात फिरू न देण्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला आहे. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन पालघर जिल्ह्यातून जाणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी नुकतेच मार्ग जाहीर केले. जिल्ह्यातील खोडावे, जलसार, मिठागर, विपाथन बुद्रुक, शिल्टे, मांडे, विराथन खुर्द, रामबाग, माकुणसार, रोठे, केळवे रोड, कमारे, वरखुंटी, नवली, मोरवली, वेवूर, अंबाडी, घोलवीरा, शेलवाडी, नंदोरे, पडघे, कल्लोळे, खानिवडे, वाळवे, शिरगांव, हनुमाननगर येथून बुलेट ट्रेन मार्ग जाणार आहे.

बोईसरमधील माण या ठिकाणी बुलेट ट्रेनचा थांबा असेल. या मार्गासाठी ५९ हेक्टर जमीन संपादन केली जाणार आहे. त्यासाठीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात २६ गावांमधील ५९ हेक्टर जमीन थेट वाटाघाटीद्वारे खरेदी केली जाणार आहे. जिल्ह्यातील ग्रामस्थांचा याला विरोध असून मनसेनेही यात उडी घेतली आहे. या मार्गासाठी भूसंपादन आणि जमिनींच्या सर्व्हेक्षणाची प्रक्रिया सुरू होणार आहे. याला मनसेने विरोध केला असून सर्व शक्तिनिशी बुलेट ट्रेनला विरोध करणार असल्याचे मनसेचे नेते कुंदन संख्ये यांनी सांगितले महामार्गालाही विरोध बुलेट ट्रेनप्रमाणे मनसेने मुंबई बडोदा राष्ट्रीय महामार्गाला विरोध केला आहे. या राष्ट्रीय महामार्गासाठी डहाणू ते तलासरीपर्यंतच्या आदिवासींच्या जमिनी संपादित करण्यासाठी डहाणू प्रांताधिकारी कार्यालयात जमीनधारकांसाठी ठेवलेली सुनावणीही मनसेने उधळून लावली. या राष्ट्रीय महामार्गासाठी पावणेचार हजार खातेदारांच्या जमिनी जाणार आहेत, तसेच ७० हजारांहून अधिक झाडांची कत्तल केली जाणार आहे.

# मराठी शाळांना आदिवासी विद्यार्थ्यांचा आधार

मराठी शाळांमधील पटसंख्या रोडावू लागल्याने ठाणे, कल्याण, डोंबिवली तसेच आसपासच्या परिसरातील शाळा व्यवस्थापनांनी गरीब, गरजू, अनाथाश्रमातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाचे दरवाजे खुले करत मराठी वर्ग सुरू राहतील यासाठी प्रयत्न सुरू केल्याचे चित्र दिसू लागले आहे. मराठी शाळांना सरकारकडून मोठ्या प्रमाणावर अनुदान दिले जाते. मराठी वर्ग बंद पडले तर अनुदानही हातचे जाईल, अशी चिंता अनेक शाळा व्यवस्थापनांना सतावू लागली आहे. या पार्श्वभूमीवर मराठी वर्ग सुरू राहण्यासाठी शिक्षण संस्थांनी विविध समाजपयोगी उपक्रम हाती घेतले असून आदिवासी पाडे, आश्रमशाळा, झोपड्यांमधील शेकडो गरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाचा मार्ग यामुळे खुला झाला आहे.



मराठी माध्यमाच्या शाळेत विद्यार्थ्यांचे प्रवेश कमी होत असल्याने अनेक मराठी शिक्षण संस्थांना आतापासूनच भविष्याची चिंता सतावू लागली आहे. ठाण्यातील काही नामवंत मराठी शिक्षण संस्थांनी काळाची पावले ओळखून इंग्रजी शाळा सुरू केल्या. काही संस्थांच्या जागा शहरात अतिशय मोक्याच्या ठिकाणी आहे. त्यामुळे शाळांची पुनर्बांधणी करत खासगीकरणाद्वारे त्यातून महसूल उभा करण्याचे प्रयत्नही नौपाडा तसेच आसपास असलेल्या काही शिक्षण संस्था करताना दिसत आहे. असे असले तरी आहेत त्या मराठी शाळा टिकाव्यात यासाठी काही संस्थांनी विशेष प्रयत्न सुरू केले आहेत.

वर्तकनगर येथील ब्राह्मण शिक्षण मंडळाच्या शाळेत गेल्या काही वर्षांपासून येऊरमधील आदिवासी पाड्यावरील अनाथआश्रमातील मुलांना मोफत शिक्षण देण्यात येत आहे. या मुलांच्या शिक्षणाच्या खर्चासाठी शाळेतील शिक्षक आणि माजी विद्यार्थी पुढाकार घेताना दिसत आहेत. येऊरमधील आदिवासी पाड्यावरून मुलांना शाळेत आणण्यासाठी तसेच आश्रमाच्या ठिकाणी पोहचवण्यासाठी खास वाहनाची सुविधा देण्यात आली आहे. सध्या ६ ते १८ वयोगटातील अनाथाश्रमातील ६० मुले या शाळेत शिक्षणाचे धडे गिरवत आहेत. ठाणे शहराबरोबरच अंबरनाथ, बदलापूर येथील शाळांमध्ये असाच उपक्रम राबवण्यात येत असून मराठी शाळांच्या पटसंख्या वाढवण्यासाठी याचा उपयोग होत असल्याचे काही संस्थाचालकांकडून सांगण्यात येत आहे.

अंबरनाथ येथील ठाकूरपाडा आदिवासी पाड्यावरील २५ विद्यार्थी सध्या श्रीमती सुशीलाताई दामले या शाळेत मोफत शिक्षण घेत आहे. या विद्यार्थ्यांचाही शैक्षणिक खर्च माजी विद्यार्थ्यांकडून करण्यात येत आहे. अनाथाश्रमातील मुलांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने शाळेत मोफत शिक्षण दिले जात असले तरी या मुलांच्या प्रवेशामुळे मराठी शाळेची पटसंख्या वाढण्यास निश्चितच सहकार्य होत आहे, असे अंबरनाथच्या महात्मा गांधी विद्यालयाचे माजी विद्यार्थी विनायक पटवर्धन यांनी सांगितले.

# कल्याण आरटीओ कार्यालयाचे रूप पालटणार

**कल्याण** - कल्याण उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वाढत्या पसाऱ्याच्या तुलनेत आता अस्तित्वात असलेली वास्तू अत्यंत अपुरी आहे. त्यामुळे इथे कामानिमित्ताने येणाऱ्या वाहनचालकांची गैरसोय होते. परिवहन कार्यालयाची आता या कोंडीतून लवकरच सुटका होणार आहे. राज्य शासनाच्या परिवहन विभागाने नुकताच आरटीओ कार्यालयाच्या नूतनीकरणासाठी १० कोटींचा निधी मंजूर केला असून यातून कार्यालयाची दुमजली इमारत उभी राहणार आहे. त्यामुळे येथील व्यवहार सोपे होण्यास मदत होणार आहे.

डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर तर दुसरीकडे शहाड, कल्याण ग्रामीणचा भाग, टिटवाळा अशा मोठ्या लोकसंख्येच्या भागाला आपल्या वाहनाच्या संबंधातील कामांसाठी कल्याणच्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयावर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे या कार्यालयात नेहमीच गर्दी पाहायला मिळते. विविध वाहन परवाने, परवाना नूतनीकरण, वाहन क्रमांकमिळवणे, भंगारातील, जप्त केलेली वाहने ठेवणे अशा विविध कामांसाठी कल्याणच्या आरटीओ कार्यालयात दरदिवशी शेकडो नागरिक येत असतात. मात्र चाळवजा कार्यालये, वाहनचालकांना बसण्यासाठी पुरेसी जागा नसणे, तोकडे छप्पर, त्यात यंत्रणेतील फोलपणाचा अनेकदा वाहनचालकांना फटका बसतो.

# बदलापुरातून तब्बल २०७ किलो गांजा जप्त

## शहरात अमली पदार्थाची तस्करी वाढत असल्याचे उघड

बदलापूर औद्योगिक वसाहतीतील बंद कारखान्यातून तब्बल सात कोटी रुपयांचे द्रवरूप मेफ्रेडॉन जप्त केल्यानंतर तिसऱ्याच दिवशी कल्याण पूर्व प्रादेशिक विभागाच्या अपर पोलिस आयुक्तांनी नेमलेल्या पथकाने तपासणीदरम्यान २०७ किलो गांजा जप्त केला आहे. ठाणे, कल्याण, भिवंडी यासारख्या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थ विक्रीचे जाळे विणले जात असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत असताना बदलापुरातून एवढ्या मोठ्या प्रमाणावर गांजा जप्त झाल्याने शहरात अमली पदार्थाची तस्करी वाढल्याचे दिसून येत आहे.

कल्याण आणि उल्हासनगर परिमंडळातील अवैध आणि अनैतिक धंद्यावर कारवाई करण्यासाठी अपर पोलीस आयुक्त डॉ. प्रताप दिघावकर यांनी विशेष पथकाची नेमणूक केली होती.



त्या पथकातील प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित जाधव यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे बदलापूर पश्चिमेतील बस स्थानकावर सापळा रचला होता. बदलापूरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र आगरकर, दीपक जाधव यांच्या सहकाऱ्यांनी त्या ठिकाणी पोलिसांनी नरेश अहिरे या तरुणाला ३० हजार रुपये किमतीच्या २ किलो २०० ग्रॅम वजनाचा गांज्यासह अटक केली. बदलापूर जवळील ढोके दापिवली येथील राजाराम कडू यांच्या फार्म हाऊ समध्ये अधिक गांजा असल्याची माहिती त्याने चौकशीदरम्यान दिली. त्यानुसार छापा टाकला असता तेथे हा २०७ किलो ६०० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करण्यात आला. या फार्महाऊ सजवळ उभ्या असलेल्या दोन आलिशान गाड्यांतूनही गांजा जप्त करण्यात आला. या गाड्याही ताब्यात घेण्यात आल्या आहेत. या प्रकरणी पोलिसांनी नरेशसह कुणाल कडू, सन्नी परदेशी आणि अमोल घनघाव यांना अटक केली आहे.

# वाघा बॉर्डरवर पाकिस्तानी बॉलरचं चिथावणीखोर कृत्य, बीएसएफचा संताप

**वाघा बॉर्डरजवळ एका पाकिस्तानी क्रिकेटपटूने केलेल्या चिथावणीखोर कृत्यामुळे सीमा सुरक्षा दलाचे जवान चांगलेच संतापले आहेत. भारताकडून पाकिस्तानी क्रिकेटपटूच्या कृत्याबाबत आक्षेप नोंदवण्यात आला आहे. नेहमीप्रमाणे वाघा बॉर्डरवर ध्वज उतरवण्याचा सोहळा (फ्लॅग डाउन परेड सेरेमनी) सुरू असताना पाकिस्तानच्या क्रिकेट टीमचा वेगवान गोलंदाज हसन अली याने बीएसएफच्या जवानांकडे आणि भारतीयांकडे पाहून इशारे केले.**



२१ एप्रिल रोजी पाकिस्तान क्रिकेट टिमचे काही खेळाडू ध्वज उतरवण्याचा सोहळा पाहण्यास आले होते. या दरम्यान, भारत आणि पाकिस्तानचे जवान परेड करत असतानाच हसन अली पाकिस्तानी सैनिकांच्या मधोमध जाऊन उभा राहिला. पाकिस्तानचे जवान परेडमध्ये जे काही करत होते तसंच कृत्य हसन अली भारतीयांकडे पाहून करत होता, पण आश्चर्य म्हणजे यावेळी पाकिस्तानच्या लष्करानेही त्याला रोखण्याचा प्रयत्न केला नाही. मैदानावर गडी बाद केल्यानंतर ज्या प्रकारे अली आनंद साजरा करतो त्याचप्रमाणे तो भारतीयांकडे पाहून इशारे करत होता. बीएसएफने पाकिस्तानच्या क्रिकेटपटूच्या या कृत्यावर नाराजी जाहीर केली आहे. प्रोटोकॉलनुसार सेरेमनीमध्ये केवळ जवानच सहभागी होऊ शकतात, सामान्य व्यक्तीला सहभागी होता येत नाही असं बीएसएफने म्हटलं आहे. याबाबत पाकिस्तानी रेंजर्सला फोन करुन विरोध दर्शवण्यात आला आहे अशी माहिती बीएसएफचे अधिकारी मुकुल गोयल यांनी इंडियन एक्सप्रेसला दिली.

हसन अलीचा हा चिथावणीखोर व्हिडीओ क्रिकेटबाबत बातम्या देणारी वेबसाइट क्रिकइन्फोने शेअर केला आहे. पाकिस्तानचं वृत्तपत्र 'डॉन'हा व्हिडीओ आपल्या फेसबुक पेजवर शेअर केला असून मोठ्या प्रमाणात हा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

## पॉर्न पाहणाऱ्या मुलाचा आईवर बलात्कार

**गुजरात -** मोबाईलमध्ये अश्लिल (पॉर्न) व्हिडिओ पाहण्याचं व्यसन जडलेल्या एका मुलानं आपल्या जन्मदात्या आईवर बलात्कार केला. ही संतापजनक घटना गुजरातमधील पालनपूरमध्ये उघडकीस आली. आरोपी मुलाला पोलिसांनी अटक केली आहे.

गुजरातमधील पालनपूर येथे राहणाऱ्या या मुलाला मोबाईलमध्ये अश्लिल (पॉर्न) व्हिडिओ पाहण्याचं व्यसन जडलं होतं. तो रात्र-दिवस अश्लिल चित्रपट पाहायचा. घरात आई व बहिणीसमोरही तो चित्रपट पाहायचा. रात्री १ च्या सुमारास पाणी प्यायच्या बहाण्याने तो आईच्या खोलीत गेला. आई झोपल्याचं पाहून त्यानं तिच्यावर बलात्कार केला. मुलाच्या या कृतीनं आईला प्रचंड धक्का बसला. सकाळी उठल्यावर तिनं कामानिमित्त बाहेर असलेल्या पतीला फोन करून घडलेला सर्व प्रकार सांगितला. अहमदाबादला असलेल्या मोठ्या मुलाला सांगून त्याच्याविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्याचा सल्ला पतीनं दिल्यानंतर आरोपी मुलाविरुद्ध गुन्हा नोंदवला असून त्याला अटक केली आहे.

# मद्याच्या जाहिरातींचे फलक हटवा

### मीरा- भाईदरमधील मद्यविक्री दुकानांना उत्पादन शुल्क विभागाचे आदेश

**बीयर बार आणि वाइन शॉपमध्ये केवळ मद्य विक्री करण्याचीच परवानगी मिळते, मद्याची जाहिरात करण्यास त्यांना परवानगी नाही. परंतु मीरा भाईदरमधील मद्य विक्रीची दुकाने आणि बीयर बार नियम धाब्यावर बसवून चक्क मद्य कंपन्यांची खुलेआम जाहिरात करत आहेत. माहिती अधिकार कार्यकर्त्याने याविरोधात आवाज उठविल्यानंतर जाहिरातींचे फलक उतरविण्याचे आदेश उत्पादन शुल्क विभागाकडून जारी करण्यात आले आहेत.**




राज्यात मद्यविक्रीस बंदी नसली तरी मद्यप्राशनाला प्रोत्साहन मिळेल असे कोणतेही कृत्य करण्यास सक्त मनाई आहे. ज्या ठिकाणी मद्यविक्री केली जाते अशा ठिकाणी ग्राहक आकर्षित होईल अशा तऱ्हेने मद्याचे उत्पादन करणाऱ्या कंपन्या आणि त्यांची उत्पादने यांची जाहिरात करायच्या नाहित, असे शासनाचेच धोरण आहे. उत्पादन शुल्क विभागाकडून देण्यात येणाऱ्या मद्यविक्रीच्या परवान्यावर देखील हे स्पष्टपणे नमूद केलेले असते.

मीरा भाईंदर शहरातील ठिकठिकाणच्या वाइन शॉपवर मद्याच्या भल्या मोठ्या जाहिराती झळकत असल्याने वसंत माने यांनी कुतुहलापोटी या जाहिरातींच्या परवानगीबाबतची माहिती उत्पादन शुल्क विभागाकडून घेतली. त्यावेळी मद्य उत्पादन कंपन्यांच्या जाहिराती मद्यविक्रीच्या ठिकाणी तसेच आसपासच्या इमारतींवर लावण्यास मुंबई मद्य निषेध कायद्या अंतर्गत मनाई करण्यात आली असल्याचे समजले. त्यामुळे या जाहिरातींविरोधात माने यांनी उत्पादन शुल्क विभागाकडे तक्रारी केल्या. त्यानंतर वाइन शॉपवरील जाहिरातींमधील केवळ मद्याच्या नावावरच काळा कागद चिकटविण्यात आला, परंतु जाहिरात फलकावरील मद्याच्या बाटल्या तसेच कंपनीचे नाव ठळकपणे दिसेल अशा पद्धतीने तसेच ठेवण्यात आले.

## जगातील ७० कोटी कामगार दारिद्र्यात

विकसनशील आणि नव्याने उदयाला येणाऱ्या देशांतील ७० कोटी कामगार आजही दारिद्र्यात राहात आहेत. या कामगारांचे दैनंदिन उत्पन्न ३.१० डॉलरच्या निकषापेक्षा कमी असल्याचे आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने म्हटले आहे.




आंतरराष्ट्रीय नाणेनिधीबरोबरील वार्षिक बैठकीमध्ये आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे महासंचालक गाय रायडर यांनी ही माहिती दिली. 'अर्थव्यवस्थांची पुनर्बांधणी होत असताना, २०१७ ते २०१९ या तीन वर्षांच्या काळामध्ये रोजगारनिर्मितीचे प्रमाण वाढले असून, बेरोजगारीचा जागतिक दरही कमी होणे अपेक्षित आहे. मात्र, विविध देशांच्या समूहांचा विचार करता, कामगारांच्या दृष्टीने होणारी प्रगती समान वेगाने होताना दिसत नाही. विकसनशील आणि नव्याने उदयाला येणाऱ्या देशांमध्ये बेरोजगारांच्या प्रमाणामध्ये होणारी वाढ कायम आहे,' असे रायडर यांनी सांगितले. जगात २०१७ या वर्षात लक्षणीय प्रगती झाल्यानंतरही, ७० कोटी कामगार दारिद्र्यामध्ये राहात आहेत. विकासाचा वेग कमी झाला असून, वाढत्या कामगार संख्येच्या प्रमाणामध्ये विकासाचा वेग राखण्यामध्ये अनेक विकसनशील देशांना अपयश आले आहे.

# मानसिक आजारांना तूर्तास विमा संरक्षण नाही!

**मानसिक आजाराने ग्रस्त रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून एकट्या भारतात सात कोटी मनोरुग्ण आहेत. प्रदीर्घ काळ चालणाऱ्या या उपचारासाठी लागणारा खर्च कुटुंबाच्या आवाक्याबाहेर जात असतानाही विमा कंपन्यांनी या आजाराला विमासंरक्षण नाकारले आहे. मनोविकारावरील कुठल्याही उपचारांना विमा संरक्षण नाही, असे एका वाक्यात उत्तर देऊन विमा कंपन्या हात वर करीत आहेत. मानसिक आरोग्य विधेयक येऊनही अद्याप विमा कंपन्यांनी रस दाखविलेला नाही. भरमसाठ अतिरिक्त प्रीमिअम आकारण्याच्या तयारीत विमा कंपन्या आहेत.**



मानसिक आजारानी ग्रस्त रुग्णांमध्ये प्रामुख्याने नैराश्य, चिंता आदी विकार आढळत आहेत. स्किझोफ्रेनिया, बायपोलर, ओसीडी या विकारांनी ग्रस्त रुग्मांची मानसोपचार तज्ज्ञांकडे गर्दी वाढत आहे. आत्महत्येचे विचार सतत घोळत असणाऱ्या यातील अनेक रुग्णांवर इलेक्ट्रोकन्वल्सिव्ह थेरपी (ईसीटी) म्हणजेच शॉक ट्रीटमेंट हा एक प्रभावी उपचार आहे. याशिवाय रिपिटिटिव्ह ट्रान्सक्रॅनिअल मॅग्नेटिक (आरटीएमएस) तसेच थीटा बर्स्ट आदी उपचार उपलब्ध आहेत. मात्र हे सर्व उपचार खर्चिक आहेत. ईसीटीच्या ११ उपचारसत्रांसाठी (सिटिंग्जसाठी) ६० ते ७० हजार रुपये खर्च येतो तर आरटीएमएसची किमान २० सत्रे घ्यावी लागतात. त्यासाठी किमान ७५ हजार रुपये खर्च आहे. मात्र हा खर्च मानसिक आजारांसाठी असल्याचे कारण पुढे करीत याबाबतचे दावे विमा कंपन्या मान्य करीत नाहीत. या उपचारासाठी आवश्यक असणारी यंत्रणाच महागडी असल्यामुळे रुग्णांकडून इतके शुल्क आकारावे लागते, याकडे मानसोपचार तज्ज्ञांनी लक्ष वेधले आहे.

देशाचा विचार करायचा झाला तर सात कोटींपैकी ३५ लाख रुग्णांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करावे लागते. परंतु देशात या उपचारांची सोय केवळ ४० रुग्णालयांत असून त्यात फक्त २६ हजार खाटा आहेत, याकडेही एका मानसोपचार तज्ज्ञाने लक्ष वेधले. सरकारी रुग्णालयातील परिस्थिती फारशी आशादायक नाही. मुळात मानसिक आजार लपविण्याची वृत्ती असल्यामुळे खासगी उपचार घेण्याकडेही मनोरुग्णांच्या आप्तांचा कल असतो.

एकीकडे कर्करोग, हृदयरोगासह बहुतांश सर्वच रोगांना विमा संरक्षण आहे. मनोविकार हे मेंदूशी संबंधित आहेत आणि मेंदू हा शरीराचा भाग नाही का, असा सवार प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. संदीप जाधव यांनी केला. मानसिक आरोग्य कायद्यात विमा संरक्षणाबाबत अगदी पुसटसा उल्लेख आहे. प्रत्यक्षात मनोरोग एखाद्याचे आर्थिक गणित जितके बिघडवतो तेवढा अन्य कुठलाही आजार नाही. त्यामुळे मानसिक आजारांना विमासंरक्षण आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

# भारत–चीन संबंध सुधारणार?

### पुढील आठवड्यात पंतप्रधान जाणार चीन दौऱ्यावर, शी जिनपिंग यांची घेणार भेट



युरोप दौऱ्यावरून परतल्यानंतर आता पंतप्रधान नरेंद्र मोदी लवकरच चीनच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग यांची भेट घेणार आहेत. परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज आणि चीनचे समकक्ष प्रतिनिधी वांग यी यांची आज बीजिंग येथे भेट झाली. यावेळी झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत चीनचे परराष्ट्रमंत्री यी यांनी ही माहिती दिली. २७ आणि २८ एप्रिल रोजी अनौपचारिक उच्चस्तरीय बैठकीत मोदी आणि जिनपिंग हे दोन्ही नेते एकाच व्यासपीठावर येणार आहेत, अशी माहिती यावेळी यी यांनी दिली.

दोन्ही देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांमधील बैठकीत द्विपक्षीय संबंधात सुधारणेसाठी आणि उच्चस्तरीय संवादाची गती वाढवण्यावर चर्चा झाली. यावेळी सुषमा स्वराज म्हणाल्या, दोन्ही देश दहशतवाद, हवामान बदल आणि जागतिक आरोग्य यांसारख्या मुद्द्यांवर एकत्र काम करणार आहेत. तर चीनकडून २०१८ मध्ये सतलज आणि ब्रह्मपुत्रा नदीबाबतची माहिती प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

शांघाई सहकार्य संघटनेच्या (एससीओ) मंत्र्यांच्या बैठकीत सहभाग घेण्यासाठी सुषमा स्वराज शनिवारी चार दिवसांच्या दौऱ्यासाठी चीन दौऱ्यावर गेल्या आहेत. द्विपक्षीय भेटीपूर्वी वांग यांनी पेइचिंग येथील दिआयुतई स्टेट गेस्ट हाऊस येथे सुषमा स्वराज यांचे स्वागत केले. स्टेट काऊंसिलर झाल्यानंतर वांग आणि स्वराज यांची ही पहिलीच भेट झाली.

या भेटीदरम्यान, सुषमा यांनी वांग यांना स्टेट काऊंसिलर झाल्याबद्दल आणि भारत चीन सीमेसंदर्भात विशेष प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केल्याबद्दल अभिनंदन केले. दरम्यान, वांग यांनी सांगितले की, द्विपक्षीय संबंधांमध्ये उल्लेखनीय विकास झाला आहे. त्याचबरोबर दोन्ही देशांच्या नेत्यांच्या देखरेखीखाली या वर्षी सकारात्मक गोष्टीही घडल्या आहेत.




# आता फरार आर्थिक गुन्हेगारांची संपत्ती होणार जप्त

**नवी दिल्ली - आर्थिक गुन्हे करून देश सोडून पळून जाणाऱ्या गुन्हेगारांची संपत्ती जप्त करून त्यांची नाकेबंदी करण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. याबाबत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबतच्या अध्यादेशास मंजुरी मिळाली आहे. राष्ट्रपतींच्या सहमतीनंतर यावर शिक्कामोर्तब होणार आहे.**



लोकसभेत १२ मार्चला 'फरार आर्थिक गुन्हेगार विधेयक २०१८' हा अध्यादेश सादर करण्यात आला होता. परंतु संसदेत झालेल्या गोंधळामुळे हे विधेयक मंजूर होऊ शकले नव्हते. विजय मल्ल्या आणि नीरव मोदीसारखी प्रकरणे समोर आल्यानंतर हा अध्यादेश आणण्याचा सरकारने निर्णय घेतला होता.

कर्ज घेतल्यानंतर जे परदेशात पळून जातात आणि देशात परतण्यास नकार देतात अशा गुन्हेगारांना, तसेच त्यांनी केलेल्या गुन्हाविरोधात अटक वॉरंट काढण्यात आले असेल अशा गुन्हेगारांना, तसेच ज्यांनी १०० कोटी रुपयांहून अधिक कर्जासाठी ज्यांचे नाव डिफॉल्टर्स यादीत नमूद असेल अशा गुन्हेगारांना या विधेयकातील तरतुदी लागू होणार आहेत.

या अध्यादेशानुसार, अशा गुन्हेगार व्यक्तींच्या परवानगी शिवाय त्यांची संपत्ती जप्त केली जाऊ शकणार आहे. या अध्यादेशातील तरतुदींनुसार जप्त केलेल्या संपत्तीचा लिलाव करून ते कर्ज फेडण्याचे कामही होणार आहे. शिवाय अशा आर्थिक गुन्हेगारांविरोधात पीएमएलए कायद्यांतर्गत खटला चालवला जाणार आहे.

या अध्यादेशानुसार, संचालक किंवा उपसंचालक (एमपीएलए, २००२ अंतर्गत नियुक्त) विशेष कोर्टासमोर कर्ज घेऊन परतावा न करणाऱ्या व्यक्तीला पळून गेलेला आर्थिक गुन्हेगार घोषित करण्याची मागणी करू शकणार आहेत. मात्र संबंधित व्यक्तीला पळून गेलेला आर्थिक गुन्हेगार का ठरवावे याची कारणेही द्यावी लागणार आहेत.

या मागणीपत्रानंतर विशेष कोर्ट त्या व्यक्तीला नोटीस पाठवून ६ आठवड्यांमध्ये कोर्टासमोर हजर राहण्याचे आदेश देऊ शकते. त्यानंतर ती व्यक्ती कोर्टाच्या आदेशानुसार हजर राहिली, तर त्याला पळून गेलेला आर्थिक गुन्हेगार म्हणून संबोधण्याची मागणी रद्द करण्याची तरतूदही अध्यादेशात करण्यात आली आहे.

## काँग्रेसला झटका!

### उपराष्ट्रपतींनी महाभियोगाचा प्रस्ताव फेटाळला

**नवी दिल्ली -** सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांच्याविरोधातील महाभियोगाचा प्रस्ताव उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांनी फेटाळला आहे. विरोधी पक्षाच्या राज्यसभा खासदारांनी महाभियोगाचा प्रस्ताव दिला होता. उपराष्ट्रपतींचा हा निणऱ्य काँग्रेसला मोठा धक्का मानला जात आहे. शुक्रवारी काँग्रेससह सात विरोधी पक्षाच्या खासदारांनी सरन्यायाधीशांविरोधांत पदाचा दुरुपयोग व अन्य आरोपांतर्गत महाभियोग प्रस्ताव दाखल केला होता. या प्रस्तावावर ७१ खासदारांच्या सह्या होत्या.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)